UGC

22

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2019 Special Issue –165 (B)

hief Editor -
r. Dhanraj T. Dhangar,
t. Prof. (Marathi)
GV'S Arts & Commerce College,
eola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marath
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019


| | | | |
|---|---|---|---|
| 66 | लोकशाहीचा आधार गांधी विचार | जोतिराम माने | 319 |
| 67 | महात्मा गांधी यांचे राजकीय विचार आणि सद्यस्थितीतील भारतीय लोकशाही | डॉ.वनिता साबळे-चव्हाण | 321 |
| 68 | महाराष्ट्रातील कुक्कुटपालन व्यवसायाची सद्यस्थिती आणि व्यवस्थापन | डॉ.सुधाकर जाधव व अभिजीत भामरे | 325 |
| 69 | रविंद्र शोभणेची 'सव्वीस'दिवस : संघर्ष व सर्जनाच्या पाऊलखुणा | प्रा.संजय गोहणे | 331 |
| 70 | सामाजिक न्याय – महिला आरक्षण | डॉ. शोभा चौधरी | 341 |
| 71 | भारतातील जातीव्यवस्था आणि जाती निर्मुलन विषयक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार | डॉ.पद्माकर दारोंडे | 344 |
| 72 | टू सर, विथ लव्ह – ई. आर ब्रेथवेट (अनूवाद : लीना सोहोनी) | डॉ. दीपक गायकवाड | 348 |
| 73 | बाटचाल माझ्या देशाची | डॉ. अनिता वाळके | 353 |
| 74 | वीरगळ संग्रहालय : वेळापूर | डॉ. संजय वाघमारे | 358 |
| 75 | जयवंत दळवी यांच्या नाटकांतील मनोविश्लेषण | डॉ. आनंद वारके | 364 |
| 76 | मानवधिकार आणि कामगार (Human Rights and Workers) | प्रा.बालाजी घुटे | 370 |
| 77 | महिला सबलीकरण व पंडिता रमाबाई | डॉबावलगावे .चंदन एम . | 375 |
| 78 | क्रीडा क्षेत्र आणि महिला | डॉ.विजय पडवळ | 379 |
| 79 | श्रीमती इंदिरा गांधी : व्यक्ती आणि कार्य | डॉ. महेश गोमासे | 381 |
| 80 | नैसर्गिक आपत्ती आणि शेती व्यवसाय एक विशेष अभ्यास | प्रा. दत्तू टाकोळे | 384 |
| 81 | महाराष्ट्रातील जिल्हानिहाय लिंगगुणोत्तराचा चिकित्सक अभ्यास | डॉ. सुदर्शन सोनवणे | 389 |
| 82 | संत संकल्पना व स्वरूप | डॉ. रविंद्र बेम्बरे | 395 |
| 83 | महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक विचारातील स्त्रीवाद : एक अभ्यास | प्रा. महानंदा राऊतखेडकर | 400 |
| 84 | शास्त्रीय संगीतातील महिलांचे कार्य | प्रा. सौ. दिपाली पांडे | 404 |
| 85 | राज्यविहीन समाज व आदर्श राज्य अहिंसा प्रधान राज्याची कल्पना | डॉ.महेश मोटे | 409 |
| 86 | दुसरे इंग्रज – मराठा युद्धात नवाब सालाबतखाँची भूमिका | डॉ.संदिप राऊत | 413 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

संशोधन पद्धती (Reserch Methodology)

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी चरित्रात्मक संशोधन पद्धती, समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, मानसशास्त्रीय संशोधन पद्धती, आशयनिष्ठ संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीच्या अनुषगाने अभ्यास करण्यात आला आहे.

टू सर, विथ लव्ह – ई. आर ब्रेथवेट

मग्रीनस्लेड सेकंडरी स्कूलफ मध्ये ब्रेथवेट यांची शिक्षक म्हणून नियुक्ती झाली होती. शाळा शोधत शोधत ते शाळेत पोहोचतात. हेडमास्तर ए. फ्लोरियन त्यांचे स्वागत करतात. प्रथम वर्गात गेल्यावर त्यांच्या लक्षात आले की, चाळीस विद्यार्थी उपस्थित असूनही शिक्षकांचा पत्ताच नाही. मळके व खराब कपडे घातलेली मुले-मुली वर्गामध्ये होत्या. ङ्गशाळेत शिकवण्याविषयीची माझी कल्पना फारच वेगळी होती. स्वच्छ वर्ग, वर्गात बाकावर ओळीने बसलेली नीटनेटकी, शिस्तीची मुलं... पण; आत्ताचा हा वर्ग म्हणजे निव्वळ सर्कस होता.ङ्घ (पृष्ठ क्र.१० ) ब्रेथवेट यांच्या ती शाळा, वर्ग, मुलांची वेडीवाकडी संभाषणे ऐकून त्यांच्या मनात हे विचार येतात. मुलांनाही एक नवीन बकरा सापडला याचा आनंद होतो.

शाळेतले एकूण वातावरण पाहून ब्रेथवेट यांचे मन खूप उदास होते. स्टाफरुममधील अस्वच्छता व मुलामुलींची शारीरिक अस्वच्छता, स्वच्छताघराची अस्वच्छता हे सर्व पाहून त्यांना आश्चर्य वाटते. मुख्याध्यापक त्यांना शाळेची परिस्थिती समजावून सांगतात. येथे शिकणारी मुले उनाड असून शिक्षकांना त्रास देतात, त्यांचा अपमान करतात, मागास भागातून ही मुले येतात. अन्न, वस्त्र, निवारा या तीन प्राथमिक गरजा त्यांना मिळालेल्या नसतात, घरच्या वातावरणाचा शारीरिक व मानसिक ताण त्यांच्यावर असतो. त्यामुळे त्यांची नैतिकदृष्ट्या व्यवस्थित वाढ होऊ शकत नाही. त्यांची विविध प्रकारचे ताणतणाव समजून घेऊन आपण मुलांना मदत करत असतो. त्यांची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची आहे. चांगले जेवण पुरेसे नसल्यामुळे शाळेत व वर्गात ती जास्त रमत नाहीत. आहेरे आणि नाहीरे या समाजामधील संघर्ष ब्रेथवेट यांच्या लक्षात येतो. शाळेतील बरीच मुले धुमपान, शिवीगाळ व उर्मटपणे बोलणारी होती. भोवतालच्या परिस्थितीमुळे शाळेशिवाय त्यांच्यावर वाईट संस्कार झालेले असतात. मुख्याध्यापकांना आपल्या शाळेविषयी व विद्यार्थ्यांविषयी किती अपार प्रेम व कळवळा होता हे त्यांच्या बोलण्यातून दिसून येते. त्यांचा प्रत्येक विचार मुलांच्या भवितव्याची काळजी घेणारा व कल्याणाचा होता.

सन १९४५ साली रॉयल एअरफोर्समधून निवृत्त झाल्यावर अनेक दुःखद घटना ब्रेथवेट यांच्या आयुष्यात घडल्या. सन १९४० साली एअरफोर्समध्ये दाखल होण्यासाठी जेव्हा त्यांनी अर्ज केला तेव्हा त्यांचा काळा वर्ण आड आला. वर्णद्वेषामुळे त्यांची निवड होऊ शकली नाही. लहानपणीही वर्गात ते काळे असल्यामुळे उत्तीर्ण होण्यासाठी गोऱ्यामुलांपेक्षा नेहमीच जास्त मेहनत त्यांना करावी लागे; परंतु महाविद्यालयीन जीवनात त्यांना यामुळे खूप प्रेरणा मिळाली. सन १९४० साली पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले. न्यायप्रियता, सहिष्णुता आणि स्वातंत्र्य यासारख्या संकल्पनांच्या केंद्रस्थानी आपण येऊन पोहोचलो आहोत असे त्यांना वाटे याच भावनेतून ते सन १९४० मध्ये रॉयल एअरफोर्समध्ये भरती झाले.

वर्णद्वेषामुळे बाहेरच्या मुक्त जगात त्यांना अपरिचित मानहानीचा, पूर्वग्रहाचा आणि तिरस्काराचा सामना करावा लागला. एखाद्या घरमालकाचा थंड निर्विकार कटाक्ष, एखाद्या वेटरने जाणूनबुजून केलेली अपमानास्पद वागणूक, नृत्यासाठी एखाद्या तरुणीला विनंती केल्यावर तिने दिलेला नकार असे अनेक अपमान

ISSN : 2348-7143
February-2019

वर्णद्वेषामुळे ब्रेथवेट यांना पचवावे लागतात. ब्रिटिशांची निग्रो लोकांविषयी अत्यंत वाईट प्रतिमा त्यांच्या मनात होती. हे सर्व वास्तव अनुभव ब्रेथवेट यांना आले होते.

सुरुवातीला ब्रेथवेट यांना खूप झगडावे लागले. एअरफोर्समधून निवृत्त झाल्यावर त्यांना अनेक संकटांना तोंड देऊन शाळेत नोकरी मिळालेली असते. त्यांनी ती संधी मानून शाळेतील मुलांच्या अभ्यासाकडे व वागणुकीकडे बारकाईने लक्ष दिले. मूलभूत कौशल्याचा विकास त्यांच्यामध्ये कसा होईल हे पाहिले. आपल्या रोजच्या आयुष्यातील उदाहरणे देऊन त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी गोडी निर्माण केली. शिकवण्यासारख्या गोष्टीचा किती प्रचंड मानसिक ताण माणसाच्या मनावर पडू शकतो याची जाणीव प्रथमच त्यांना झाली. सुरुवातीला वर्गात गोंधळ घालणारी मुले हळूहळू ब्रेथवेट यांना सहकार्य करू लागली.

ब्रेथवेट तयारी करून वर्गात शिकवत असत. रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन ते विषय सोपा करून सांगत. काही मुले मुद्दामच गोंधळ घालण्याचा व शिवीगाळ करण्याचा प्रयत्न करत. एकदा शाळेत फायरप्लेसमध्ये एक वस्तू मुलांनी जाळली, धूर झाला सॅनिटरी नॅपकीन कोणीतरी फायरप्लेसमध्ये टाकून पेटवून दिला होता. ब्रेथवेट मुलांवर रागवले. मनात राग नव्हता; पण आपल्या वर्गाला पूर्णपणे काबूत ठेवण्यासाठी जे काही करावे लागेल तेच करावयाचे असे त्यांनी ठरवले होते.

मधल्या सुट्टीनंतर फायरप्लेस स्वच्छ धुण्यात आली होती. मुले आपआपल्या जागी गुपचूप बसली होती. मुलींनी शरमेने माना खाली घातल्या होत्या. ब्रेथवेट यांच्या नजरेला नजर लावण्याची त्यांची हिंमत नव्हती. मुलांना आपल्या वर्तणुकीची लाज वाटत आहे हे पाहून ब्रेथवेट यांना सुखद धक्का बसला. त्यांचे दंगा करण्याचे दिवस संपलेले होते. त्यांच्यामध्ये धैर्यशीलता, प्रामाणिकपणा, महत्त्वकांक्षा, स्वच्छता वाढीस लावण्याचे काम ब्रेथवेट यांनी केले. मुलांचे दृष्टिकोन बदलून त्यांच्याशी ते एकरूप झाले. इतर शिक्षकांना मात्र ब्रेथवेट यांचे हे वागणे पटत नव्हते. त्यामुळे ते वैतागलेले असायचे. फर्नमान व पामेला या मुलांबरोबर ब्रेथवेट यांचे असलेले नाते पाहता त्यांची फार मोठी जबाबदारी आपल्यावर आहे याची जाणीव त्यांना होती.

ब्रेथवेटच्या आयुष्यात या शाळेमुळे जणू परिसस्पर्श झाला होता. जीवनात आनंद निर्माण होऊन एक नवी शक्ती प्राप्त झाली होती. विद्यार्थ्यांच्या मनापर्यंत ते पोहोचले होते. मुलांमध्ये विभिन्न संस्कृती, जातिधर्मामध्ये सलोखा असावा हे विचार रुजवण्यात ते यशस्वी झाले होते. ‘आम्हाला म्हणजे आम्हाला एवढेच सांगायचंय... की, आम्हाला तुमच्याविषयी कृतज्ञता वाटते... तुम्ही आमच्यासाठी जे काही केले आहे, त्याबद्दल’ (पृष्ठ क्र. २०२) हे मॉइरा जोसेफ या मुलीचे उद्गार म्हणजे ब्रेथवेट यांनी केलेल्या कामाची पावती होती. वर्गात शिक्षकांना त्रास देणारी मुले शेवटी ब्रेथवेट यांना आदराने सर म्हणायला लागली. त्यांच्यावर प्रेम करू लागली.

एका शिक्षकाच्या शाळेविषयी व विद्यार्थ्यांविषयी मनात असणाऱ्या भावना टू सर विथ लव्ह या कादंबरीत आविष्कृत होतात. एक शिक्षक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांविषयी ब्रेथवेट यांच्या मनात असणारी आपुलकी, त्यांच्या कल्याणाचा असणारा विचार, त्यांच्या बोलण्यातून व वागण्यावरून दिसतो. विद्यार्थ्यांचे भावविश्व जाणणारे शिक्षक म्हणून ब्रेथवेट वाचकांसमोर येतात. एका गरीब बदनाम गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या व आपले पुढील आयुष्य काय आहे हे माहीत नसलेल्या मुलांना घडविण्याचे काम ब्रेथवेट यांनी केले. शाळेच्या बाहेर मुलांनी कसे वागावे याबरोबरच त्यांच्यामध्ये समतेचा विचार त्यांच्या मनात ब्रेथवेट यांनी जागृत केला आणि आपले आयुष्य घडविणाऱ्या शिक्षकाला सर्व मुले एक भेटवस्तू देऊन सत्कार करतात. त्यावर टू सर विथ लव्ह असे लिहून सर्वजण खाली स्वाक्षरी करतात. ही मुलांची भावना ब्रेथवेटविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी आहे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# टू सर, विथ लव्ह – ई. आर ब्रेथवेट (अनुवाद : लिना सोहोनी)

डॉ. दीपक बबन गायकवाड
Asst. Professor (Marathi Department)
श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती, पुणे
Email- drdeepakssmm@gmail.com
Mobile No. 9049097037

**सारांश (Abstract)**

मराठीत अनुवादाची प्राचीन परंपरा असून संस्कृत महाकाव्यापासून अव्वल इंग्रजी कालखंडापर्यंत अनुवाद झाले आहेत. पेशवाईच्या अस्तापासूनच इंग्रजी शिक्षणाचा प्रसार, मुद्रणकलेचा विकास इत्यादी गोष्टींमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात अनेक बदल झाले. साहजिकच साहित्यक्षेत्रातही बदल होण्यास सुरुवात झाली. ललित व ललितेतर साहित्याचे मोठ्या प्रमाणावर अनुवाद मराठीत होऊ लागले . मराठी साहित्यात नवीन विश्व निर्माण करण्याचे काम अनुवाद साहित्याने केले. कादंबरी हा वाङ्मय प्रकार मूळातच इंग्रजी साहित्याच्या अभ्यासातून निर्माण झालेला दिसतो. यामुळे इंग्रजी लेखकांच्या परिचयाबरोबर दोन संस्कृतीचा परिचय मराठी अभ्यासकांना झाला. मटू सर विथ लव्हफ या कादंबरीत एका शिक्षकाला आलेले अनुभव वाचकांना आत्मपरीक्षण करायला लावणारे आहेत.

**प्रास्ताविक(Intraduction)**

टू सर, विथ लव्ह ही ब्रेथवेट यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. त्यांनी आपली स्वतःची कहाणी सत्यपणे सांगितली आहे. अमेरिकन समाज जीवनातील अनेक बारकावे त्यांनी टिपले आहेत. विद्यार्थ्यांविषयी असणारी त्यांची तळमळही स्पष्टपणे दिसून येते. साहित्य हे जीवनाशी सर्वांगाने संबंधित असल्याने साहित्याचा विषय आशय जीवन हाच असतो. अनुवादित मराठी कादंबरीच्या दृष्टिकोनातून लेखक, अनुवादक व अनुवादित मराठी कादंबरीचा अभ्यास करण्याची आवश्यकता तीव्रतेने जाणवते. मराठी साहित्यातील नव्याने निर्माण झालेला हा प्रवाह जीवनातील परिवर्तनातूनच निर्माण झालेला आहे. अनुवादित कादंबऱ्यांच्या विषयांमध्ये विविधता जाणवते.

**अभ्यासविषयाचे महत्त्व, आवश्यकता(Need Of Study)**

(१) मराठीत कादंबऱ्यांचा अभ्यास झालेला आहे. अनुवादित मराठी कादंबऱ्यांचा सखोल अभ्यास झालेला नसल्याने हा संशोधन विषय नवा आहे.

(२) सातत्याने बदलत जाणाऱ्या परिस्थितीमुळे समाजाच्या व मराठी साहित्याच्या दृष्टिकोनातून हा अभ्यास विषय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives)**

(१) अनुवादित मराठी कादंबरीचा सखोल अभ्यास करणे.

(२) मराठी साहित्याच्या जडण-घडणीत अनुवादित मराठी कादंबऱ्यांचे स्थान शोधणे.

(३) अनुवादित मराठी कादंबरीचे आकलन, आस्वादन आणि वाङ्मयीन विशेष शोधणे.

कादंबरीतील अनुभवविश्व

कादंबरीतील अनुभवविश्व वाचकांना समृद्ध करत असते. ही व्यापक अनुभूती अनुवादित कादंबरीत वाचकांना वाचायला मिळते.

मटू सर विथ लव्हफ या कादंबरीत एका शिक्षकाला आलेले अनुभव वाचकांना आत्मपरीक्षण करायला लावणारे आहेत. शाळेतील शिकविण्याविषयीच्या कल्पना फारच वेगळ्या असतात. स्वच्छ वर्ग, वर्गातील नीटनेटके बाक, शिस्तीची मुले, स्वच्छ परिसर; पण लंडनमधील ग्रीनस्लेड शाळा त्याला अपवाद होती. ही शाळा म्हणजे एक सर्कसच होती. शाळेतील कित्येक मुले दररोज अंघोळ करत नव्हती. कपडे नीटनेटकी व स्वच्छ घालत नव्हती. मुली कित्येक दिवस सॅनिटरी नॅपकिन बदलत नव्हत्या. मुलांचे हात अस्वच्छ असत. मुलांच्या तोंडामधील उर्मट भाषा व वागणूक, तेथील शिक्षकांचे वागणे व बोलणे हे अनुभव वास्तवपणे दिसतात; परंतु अशा मुलांमध्ये झालेला बदल, विविध विकसित झालेली कौशल्ये, लागलेली शिस्त ही खरोखरचं वाचकांना नवीन अनुभव देणारी आहेत.

कादंबरीतून व्यक्त होणारी जीवनदृष्टी

जीवनदर्शन, जीवनदृष्टी हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. मानवी जीवनाला स्पर्श करणारा वाचकांची अपेक्षा पूर्ण करणारा कादंबरी हा वाङ्मयप्रकार आहे. अनुवादित मराठी कादंबरीत जीवनाच्या विविध घटकांचे प्रतिबिंब पडले आहे.

मटू सर विथ लव्हफ या कादंबरीत शाळेतील वातावरण नकारात्मक असूनही ब्रेथवेट यांनी परिश्रमाने त सकारात्मक केले. इतरांना आदर्श वाटेल असे काम केले. विद्यार्थ्यांमध्ये जीवनाकडे पाहण्याचा चांगला दृष्टिकोन विकसित केला. चांगल्या पदावरती काम करू लागले. या काळातही अनेक शाळांतून वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील मुले शिक्षण घेत असतात. अशा शाळांमधील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारी ही कादंबरी आहे. त्यांच्याशी सुसंगत अशी आहे. विद्यार्थ्यांना शिकविताना कोणताही कमीपणा न मानता उलट शाळेमुळे माझे आयुष्यच बदलून गेले. शाळेमुळे जीवनात आनंद निर्माण झाला, आत्मशक्ती प्राप्त झाली. मनाला दिलासा मिळाला हे ब्रेथवेट यांचे उद्‌गार शिक्षणक्षेत्रासाठी आदर्श वाटतात.

कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या मूल्यजाणिवा

विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्मसमभावाची शिकवणूक, सुसंस्कार, प्रामाणिकपणा, परिश्रम, आत्मविश्वास या मूल्यांबरोबरच विविध कौशल्ये विकसित करणाऱ्या जाणिवा मटू सर विथ लव्हफ या कादंबरीतून व्यक्त होतात. गलिच्छ वस्तीतील व शाळेतील या मुलांना ब्रेथवेट यांनी मुलींना मिस म्हणायला शिकविले. त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण केली. एका ध्येयाने प्रेरित झालेल्या शिक्षकाने मुलांच्या मनातील रागाचे, द्वेषाचे, तिरस्काराचे रुपांतर प्रेमात केले. पौगांडावस्थेतील बंडखोरीचे रुपांतर आत्मविश्वासात केले. दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून विचार कसा करायचा असतो ते मुलांना शिकविले.

समारोप

शाळेच्या दैनंदिन जीवनात क्षणोक्षणी घडणाऱ्या नाट्यावर आधारित ही एक अभिजात साहित्यकृती म्हणून मटू सर विथ लव्हफ या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. ही एक सत्य कथा असून शिक्षकीपेशाबरोबर वर्णद्वेषासारख्या प्रक्षोभक विषयाची अत्यंत संयत हाताळणी करणारी ही कहाणी आहे. ब्रेथवेट हे हुशार बुद्धीमान इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर असूनही आपल्या काळ्या वर्णामुळे त्यांना लवकरच नोकरी मिळत नाही. वणवण फिरून लंडनमध्ये ईस्ट एण्ड या गरीब बदनाम, गलिच्छ वस्तीतील एका शाळेत एक शिक्षकाची नोकरी ते स्विकारतात.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

असंस्कृत गुंडागिरी करणाऱ्या व निर्ढावलेल्या मुलांच्या आयुष्यात ते प्रकाश आणतात. त्यांच्याशी ते एवढे एकरूप होतात की एक दिवस हीच मुले त्यांना सर म्हणून आदराने हाक मारतात. एका ध्येयाने व प्रामाणिकपणाने प्रेरित होऊन मुलांमध्ये प्रेमाचे वातावरण ब्रेथवेट यांनी निर्माण केले. मुलांना चांगला विचार करायला शिकवले. एका शिक्षकाची तळमळ व कळकळ काय असते हे या कादंबरीवरून शिकता येते. एक चांगला आदर्श शिक्षक कसा असावा? हे या कांदबरीतील आशयावरून वाचकांना समजते. अनुवादक लिना सोहोनी यांनी म्हटल्याप्रमाणे एका शिक्षकाला आपल्या उनाड वाया गेलेल्या विद्यार्थ्यांविषयी वाटणाऱ्या अपार प्रेमाची ही हृदयंसगम कहाणी आहे.

ठळक निष्कर्ष

१. मराठी साहित्य पुरेपूर संपन्न व समृद्ध होण्यासाठी अनुवादाची गरज भासत आहे. ही उणीव काही प्रमाणात या अनुवादित मराठी कादंबऱ्यांनी भरून काढलेली दिसते.
२. अनुवादित मराठी कादंबरीत गुणात्मकता असून जीवनविषयक सत्याचा उलगडा करणारी आहे.
३. अनुवादित मराठी कादंबरी ही मराठी कादंबरीपेक्षा आशय व विषयाच्या अंगाने वेगळी वाटते.
४. मटू सर विथ लव्हफ ही अनुवादित मराठी कादंबरी तत्कालीन ब्रिटिश समाजाचा ढोंगीपणा, वर्णद्वेष, जातीयवादी वृत्ती याबरोबरच दररोज शाळेत घडणाऱ्या घटनांवर प्रकाश टाकते.

संदर्भग्रंथसूची

१) ब्रेथवेट, ई.आर.–मटू सर विथ लव्हफ, अनु. लिना सोहनी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००२